REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# मराठी रंगभूमीवरील दलित नाटकांतील संघर्षाचे स्वरुप

श्री.नवनाथ विश्वनाथ पाटोळे

**प्रस्तावना :**

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्य हा वाङ्‌मयीन प्रवाह प्रकर्षाने जाणवू लागला. कथा, कादंबरी, कविता, आत्मकथन इ.साहित्य प्रकारातून दलितांची दुःखे, व्यथा, वेदना, अन्याय, अत्याचार दलित लेखकांनी मांडले. त्याची जाणीव उच्चवर्गीय समाजाला साहित्याच्या माध्यमातून करुन दिली. याला नाटक हा प्रकार अपवाद नव्हता. दलित लेखकांनी नाटकातही गावकुसाबाहेरचे जीवन मांडले. आंबेडकरी विचार नाटकाव्दारे समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. कविता आणि आत्मकथन यांच्या तुलनेत 'नाटक' हा वाङ्‌मय प्रकार दलित लेखकांनी हाताळला नाही. काही मोजक्याच नाट्य लेखकांनी दलितांची दुःखे, व्यथा, वेदना मांडल्या. त्यातील निर्माण झालेला सामाजिक, आर्थिक, भूख यांच्या संघर्षाचे चित्रण काही नाटकांत आले आहे.

मराठी रंगभूमीवरील दलित नाटकांत आलेला संघर्ष पारंपरिक नाटकांपेक्षा भिन्न स्वरुपाचा आहे. दलितांना जीवन जगताना आयुष्यभर जो संघर्ष करावा लागतो, हाल अपेष्टा भोगाव्या लागतात, याचे कारण म्हणजे भारतीय संस्कृतीने अशा लोकांना दलित म्हणून उपेक्षित ठेवले. सर्वच क्षेत्रांतील विषम व्यवस्थेने अशा लोकांना दलित म्हणून उपेक्षित ठेवले. सर्वच क्षेत्रांतील विषयम व्यवस्थेने दलितांना 'माणूस' म्हणून त्यांच्या हक्कांपासून, अधिकारांपासून वंचित ठेवले. त्यामुळे मराठी रंगभूमीवरील दलित नाटकांत येणारा संघर्ष दलितेतर मानसिकतेबरोबर दलितपणा लादणाऱ्या सामाजिक व्यवस्थेबरोबर आहे. हजारो वर्षांपासून दीन-दलित आणि इतर समाज यांच्यातील संघर्ष काही प्रमाणात दलित नाटककारांना दलित नाटकांव्दारे मराठी रंगभूमीवर चित्रित केला.

- **'किरवंत'**

या नाटकांतील संघर्ष प्रेमानंद गज्वी यांनी दोन पातळ्यांवर मांडला आहे. यातील हा संघर्ष सामाजिकआणि मानसिक स्वरुपाचा आहे. यामध्ये परंपरेला छेद देऊन नव्या विचाराने जगणारी जशी नवी पिढी आहे, तशीच जून्या परंपरावादी विचारांनी बिलगणारी जूनी पिढी आहे. यात नव्या पिढीचे प्रतिनिधित्व वासुदेव करतो, तर जून्या पिढीचे प्रतिनिधित्व ढब्बूशास्त्री करतात. ढब्बूशास्त्री परंपरावादी धार्मिक व स्वार्थी आहे, तर वासुदेव रुढी-परंपरा, कर्मकांड यांच्याविरुध्द आहे. म्हणूनच 'किरवंताचे' जीवन तो नाकारतो. यविषयी म.द.हातकणंगलेकर म्हणतात, "परंपराग्रस्त समाजात एका बंडखोराची पहिली लढाई कशी यशस्वी होत नाही, तो एक विचार निर्माण होतो. हा न्याय संग्रामाची सुरुवात करतो. पहिली फेरी त्यांच्याविरुध्द जाते, पण प्रक्रिया सुरु झालेली असते. एक नवी जाणीव निर्माण झालेली असते " (१) वासुदेवच्या रुपाने ही या जाणिवेची सुरुवात झाली आहे. या नाटकातून वासुदेव आपल्या भावाला समता, न्याय आणि बंधुभावाची वागणूक मिळावी म्हणून प्रयत्न करतो, परंतु त्यात तो यशस्वी होत नाही.



- **तन माजोरी**

'तनमाजोरी' या नाटकात प्रेमानंद गज्वी यांनी मालक व शेतमजूर यांच्या संघर्षाचे चित्रण केले आहे. नाटकाच्या सुरुवातीलाच वाशा नावाचा शाळकरी मुलगा नकळपणे हुकूमशाही प्रवृत्तीच्या मालकाला विरोध करतो. या प्रसंगावरुन नाटकाच्या संघर्षाची पुसटशी कल्पना प्रेक्षकांना येते. या संघर्षाला इंगळे मास्तरची प्रेरणा आहे या नाटकातील संघर्ष जसा मालकाविरुध्द तसाच तो अन्यायी व्यवस्थेविरुध्द ही आहे. स्वत्व आणि स्वाभिमान यामुळे निर्माण झालेला संघर्ष हक्क, अधिकार व स्वातंत्र्याच्या पातळीवर पोहोचतो. यावर शरणकुमार लिंबाळे म्हणतात,

"संपूर्ण नाटक वाशा आणि मालक यांच्या संघर्षावर आधारलेले आहे. वाशा स्वतंत्र होऊ इच्छितो तर मालक त्याला गुलाम बनवू इच्छितो असा हा संघर्ष आहे " (२) असा हा संघर्ष संपूर्ण नाटकभर दिसतो. हा संघर्षाचा वनवा कधी न विझणारा आहे. या सगळ्या माजोरी तनाची राख करण्यासाठी तो भडकला आहे.

### ➢ इनामदार

गोपाळराव देशमुख गावचे वतनदार आहेत. गोपाळराव देशमुख आणि मुकिंदा यांच्यात गेल्या तीन पिढ्यापासून वैर आहे. गोपाळराव देशमुख नरशा दरोडेखोराला हाताशी धरुन मुकिंदावर सूड घेण्याचे ठरवितो. गोपाळराव या दरोडेखोराच्या मदतीने मुकिंदाचा खून करतो. त्यामुळे सगळा गाव त्याच्यावर बहिष्कार टाकाते. नाटकाच्या शेवटी गावकरी व नरशा दरोडेखोर यांच्यात धुमश्चक्री होते. नरशाला समजते की, गोपाळरावांनी आपल्याला फसविले आहे. त्यावेळी तो गोपाळरावांना गोळी घालून ठार करतो. नरशालाही फौजदार गोळी घालून मारतात.
अण्णा भाऊ साठे यांनी हा संघर्ष अतिशय ठळकपणे मांडला आहे. त्यांनी मांडलेला हा संघर्ष भिन्नवर्गीय, माणसांच्या दैनंदिन लढ्यातील आहे. म्हणून अण्णा भाऊ साठे यांचे लेखन संघर्षमय ठरते. इनामदारासारख्या वाईट माणसाचा शेवट वाईटचं होतो, असेच अण्णा भाऊ यांना या नाटकाव्दारे सांगायचे आहे.

### ➢ थांबा रामराज्य येतंय...!

'थांबा रामराज्य येतंय !' प्रकाश त्रिभुवन यांच्या या नाटकातील आनंद हा नायक दलित समाजातील कार्यकर्ता आहे. तो दलित वस्तीत शाळा चालवितो. दलित समाजातील मुले सुशिक्षित झाली तर सवर्णांशी संघर्ष करतील म्हणून गावातील पाटील शाळा जाळतो. पोलीस चौकशीचे नाटक करुन पाटलाला निर्दोष सोडतात. याचा राग आंनदला येतो. त्यामुळे दलितांना एकजूटीचे तो आवाहन करतो. पोलीस पाटील पद मागासवर्गीयांनाच मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्न करतो. परंतु पाटील आनंदवर दबाव आणतो. त्यामुळे संघर्षाची ठिणगी पडते. याविषयी अविनाश डोळस म्हणतात, "दलित समस्या हा त्याचा केंद्रबिंदू असला तरी तो एका मानवाचा संघर्ष आहे, तो ही त्याला अभिप्रेत असलेल्या एका मानवी मूल्यासाठी आहे, असा असावयास हवा." (३) अशाच मानवी मूल्यासाठीचा संघर्ष आनंदाने या नाटकात केला आहे. हा संघर्ष दलित आणि दलितेवर साहित्यातून निर्माण झाला आहे.

### ➢ खेळिया

दत्ता भगत यांनी 'खेळिया' या नाटकातून दलित समस्यांचे चित्रण केले आहे. या नाटकातील नारायणने दलितांना स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय मिळवून देण्यासाठी चळवळ उभी केली आहे. दलितांवर झालेले अन्याय नारायणला सहन होत नाही. म्हणून तो बंड करतो. परंतु भास्कर सायलूला केस जिंकून देतो. नाटकाच्या शेवटी नारायणचा खून होतो.

'खेळिया' या नाटकातील नारायणचा संघर्ष अन्यायाविरुध्द आहे. आंबेडकरी विचारात बौध्द धर्माचे तत्त्वज्ञान असल्याने नारायणचा संघर्ष शांततामय मार्गाचा आहे. दलितांची चळवळ उभारुन त्यांचे जीवनमान उंचावणे हेच ध्येय नारायणचे आहे. याविषयी शैलेश त्रिभुवन म्हणतात, "एकूण सवर्ण आणि दलित यांच्या मानसिक व्दंव्दाचे व संघर्षाचे हे नाटक आहे." (४)

### ➢ बामणवाडा

'बामणवाडा' या नाटकातील व्यक्तिरेखा जाती-जमातीचे वाडे जपण्याचा प्रयत्न करतात. शशीची आई माई ही परंपराप्रिय व सनातनी वृत्तीच्या आहेत. माईला संस्कृती टिकवायची आहे तर शशीला जाती-जमातींचे कोंडवडे नष्ट करायचे आहेत. हा संघर्ष माय-लेकींमधील आहे. समानतेचा पुरस्कार करणारे तात्यासाहेब गोडबोले अस्पृश्यांना घर भाड्याने देत नाहीत. अशोकने केलेला हा आरोप तात्यांना अस्वस्थ करतो. तात्या भाषणे करुन लोकांची मते व मने बदलण्याचा प्रयत्न करतात. परंतु स्वतःच्या पत्नीचे मन बदलू शकत नाहीत. यासाठी पती-पत्नींमध्ये नाटकात अनेकवेळा संघर्ष होताना दिसतो. यानंतरचा तिसरा संघर्ष दलित तरुण भालचंद्र साठे आणि ब्राम्हण तरुणी शशी या दोघांमधील आहे. भालचंद्र साठे आपली स्वतःची जात लपवून ब्राम्हणवाड्यात राहायला येतो. परंतु याला बामनवाड्यात दलित म्हणूनच वागणूक मिळते. त्यातून त्याची होणारी उपेक्षा रामनाथ चव्हाण यांनी चित्रित केली आहे. अशा प्रकारचा जातीच्या, धर्माच्या आणि सामाजिक पातळीवरील संघर्ष 'बामणवाडा' या नाटकात आला आहे.

वरील नाटकांतून चित्रित झालेला संघर्ष प्रस्थापित व जाचक समाजव्यवस्थेच्या विरुध्दचा आहे. दलित समाजाने नवजीवनासाठी ज्या मूल्य संकल्पना स्विकारल्या त्यासाठी वरील नाटकांत संघर्ष निर्माण झाला आहे. दलित नाटकांतून आलेला संघर्ष मराठी नाटकांपेक्षा वेगळा आहे.

## निष्कर्ष

१) दलित साहित्य प्रवाहातील कथा, कादंबरी, कवितेच्या तुलनेत दलित नाटक उपेक्षित राहिले.
२) दलित नाटकांचा संघर्ष पारंपरिक मराठी नाटकांपेक्षा भिन्न आहे.
३) दलित नाटकांत येणारा संघर्ष पारंपरिक समाजव्यवस्थेविरुध्दचा आहे.
४) दलित नाटक न्यायासाठी, हक्कासाठी संघर्ष करते.
५) दलित नाटकाच्या आंबेडकरी विचारांत बौध्द धर्माचे तत्त्वज्ञान आहे.

## संदर्भ

१) हालकणंगलेकर म.द.किरवंत (प्रस्तावना), मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई. प्रथमावृत्ती.
२) लिंबाळे शरणकुमार, साहित्याचे निकष बदलावे लागतील, सुरेश एजन्सी, पुणे. प्रथमावृत्ती पृ.१७२.
३) डोळस अविनाश, आंबेडकर विचारा आणि साहित्य, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, पृ.१०६.
४) त्रिभुवन शैलेश, दत्ता भगत यांची नाटके, पॅपिलॉन पब्लिशिंग हाऊस, पुणे. प्रथमावृत्ती, पृ.३८.